# महाराष्ट्र शासन

(सोबत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात उमदेवारांनी सादर करावयाच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत दि. २६ जून, २०१९ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीचे इतिवृत्त)

क्रमांक : टिईएम-२०१९/प्र.क्र.१८२/तांशि-४,

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
खो.क्र.४४१, चौथा मजला,
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४०९३५

दिनांक : २६ जून, २०१९

पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

( संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव,
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

२) प्रधान सचिव,
वि.जा.भ.ज., इ.मा.व.,व वि.मा.प्र.कल्याण विभाग,
मंत्रालय, मुंबई

३) प्रधान सचिव (पदुम),
कृषि व पदुम विभाग,
मंत्रालय, मुंबई

४) सचिव (कृषि),
कृषि व पदुम विभाग,
मंत्रालय, मुंबई

५) सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई.

६) सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई.

# इतिवृत्त

दिनांक २६/०६/२०१९ रोजी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत मा.मुख्यमंत्री यांजकडे आयोजित बैठकीत घेण्यात आलेले निर्णय-

| अ. क्र. | मुद्दा | मा.मुख्यमंत्री यांचे निदेश | संबंधित विभाग | अंमलबजावणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या मागास विद्यार्थ्यांसाठी अर्ज दाखल करण्याच्या वेळी जात पडताळणी प्रामणपत्र सादर करणे प्रवेश नियामक प्राधिकरणाने बंधनकारक केले आहे. तथापि, काही विद्यार्थ्यांचे जात पडताळणीचे प्रस्ताव संबंधित जिल्हा समित्यांकडे प्रलंबित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. | १. सन २०१८ च्या अधिनियम क्र.६२ द्वारे मराठा समाजाचा सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गात समावेश करण्यात आला आहे. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात पडताळणीकरीता पुरेशी यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे, चालु शैक्षणिक वर्षांत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांस प्रवेशाच्या वेळी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती करण्यात येणार नाही.<br>२. मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशाचा अर्ज भरताना जात वैधता प्रमाणपत्राची सक्ती करण्यात येऊ नये. ज्या विद्यार्थ्यांने संबंधित जात पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे अशा विद्यार्थ्यांस व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची दुसरी फेरी सुरु होण्यापूर्वी प्रवेश नियामक प्राधिकरण निश्चित करेल अशा दिनांकापर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत देण्यात यावी. याबाबत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यक ते निदेश प्रवेश नियामक प्राधिकरणास दयावेत. | १. प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग<br>२. प्रधान सचिव /सचिव- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये / उच्च व तंत्र शिक्षण / कृषी / पदुम | १ दिवस<br>१ दिवस |